**नियमीत दिवाणी दावा क्र. ७२३/२०२२**
भारतीबाई वि. शंकर व ईतर ०७
नि. क्र. ६१ पुढे.

**<u>पुढील सरतपास प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ ते ८ तर्फे विधिज्ञ श्री. एल. एन. देशपांडे यांचेमार्फतः–</u>**

१३. आता मला दि.०५/०५/२००६ रोजीचे खरेदीखत दस्त क्र.१५१५/२००६ दाखविण्यात आले. त्यावर माझी लिहुन देणार क्र.२ म्हणून सही असून ती मी ओळखतो. लिहुन घेणार मेनकुदळे यांना देखील मी ओळखतो. खरेदीखतातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशानी क्र.६३</u>** देण्यात येते.

**<u>उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. सी. बिराजदार यांचेमार्फतः–</u>**

१४. मी इयत्ता ०९ वी पास आहे. माझे वडील रावसाहेब सन १९८२ साली मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, मौजे वांगजी येथे गट क्र.९९, १०१/ब व ६९ मध्ये एकूण १९ एकर २५ गुंठे वडलोपार्जीत जमीन माझ्या वडीलांना आहे. माझे वडील जिवंत असेपर्यंत संपुर्ण शेती ते करीत होते. माझ्या वडीलांना दोन पत्नी आहेत. पहिल्या पत्नीचे नाव गोदावरी आहे. त्यांना भारतबाई व चंद्रकला या दोन मुली आहेत. दुस–या पत्नी कमलबाई माझी आई असून त्यांना मी, सुरेखाबाई व उमा अशी अपत्ये आहोत. माझ्या वडीलांसोबत कमलबाई यांचा विवाह कधी झाला हे मला सांगता येणार नाही. माझा सन १९६९ चा जन्म आहे. माझ्या जन्मापुर्वी आईचा विवाह कधी झाला होता, हे मला सांगता येणार नाही. माझी आई कमलबाई सन २००७ साली मयत झाली आहे. गोदावरीबाई सन २०२१ मध्ये मयत झाल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन्ही बहिणींचे लग्न वडीलांनी जिवंत असताना करुन दिले आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, कुटूंबाचा कर्ता म्हणून वडील जिवंत असेपर्यंत तेच कार्यभार पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, वडील मयत झाल्यानंतर कुटूंबाचा कर्ता म्हणून संपुर्ण जबाबदारी माझ्यावर आली. त्यामुळे जमीनीचे सर्व व्यवहार मी करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, वडील मयत झाल्यानंतर तिन्ही मिळकतींना कुटूंबाचा कर्ता म्हणून फेरफारला वारस म्हणून माझे नाव लागले. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६/१०/१९८८ रोजी फेरफार क्र.४३० नुसार वडील मयत झाल्यानंतर कमलबाई व गोदावरीबाई यांच्या सर्व वारसांची नावे दावा मिळकतीला नोंद झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या नोंदी आजपर्यंत कायम आहेत.

१६. सन १९८० रोजी वडीलांनी गावातील प्रतिष्ठीत माणसांसमोर जे तोंडी वाटप करुन दिले होते त्याची लेखी नोंद ठेवली होती किंवा नाही, हे मला आठवत नाही. त्यावेळी कमलबाई, गोदावरी व सर्व बहिणी जिवंत होत्या. त्या वाटपावेळी गोदावरीबाई व कमलबाई यांना व त्यांच्या मुलींना कोणतेही वाटप दिले नव्हते. वाटपात वडीलांनी देखील स्वतःला काही ठेवले नव्हते. वाटपानंतर वाटपानूसार फेरफार नोंदविण्यासाठी तलाठी यांना अर्ज दिला किंवा नाही, हे मला आठवत नाही. त्या वाटपानूसार ७/१२ उता–यावर माझ्या नावाची नोंद झाली होती. सन १९८० पासून मी दावा मिळकतीचे ७/१२ उतारे पाहिले आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सन १९८० च्या वाटपानूसार ७/१२ उता–यावर नोंदी झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१०१/ब मधील ०४ हे. ८८ आर जमीन माझ्या पत्नीच्या व मुलांच्या नावे करेपर्यंत वारसाआधारे माझ्या नावावर होती. हे म्हणणे खरे नाही की, भारतबाई

व चंद्रकला यांना सदर जमीनीचा हिस्सा मिळु नये म्हणून मी बेकायदेशीर माझ्या पत्नीच्या व मुलांच्या नावे जमीन हस्तांतरण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीतील तिन्ही गट क्रमांकावर कर्ता म्हणून मी कब्जेदार आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी वाटपाआधारे सर्व जमीनी माझ्या नावे केल्या व मी त्यावर कब्जेदार असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटपाच्या लेखी स्मरणपत्र करण्यापुर्वीच १०–०१–१९८२ रोजी माझे वडील मयत झाल्याचे मी खोटे सांगत आहे.

१८. भारतबाई व चंद्रकला यांच्या विवाहाच्या वेळी मी लहान होतो. त्यावेळी मी कोणत्या इयत्तेत शिकत होतो, हे मला आठवत नाही. माझ्या वडीलांनी कर्जाची लेखी नोंद ठेवलेली नव्हती. मी सुधीर पाटील, रा. आशिव यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, सुधीर पाटील यांच्याकडे मी जमीन गहाण ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन मी सुधीर पाटील यांच्याकडून परत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावे असलेली २१ आर व सुधीर पाटील यांच्या नावे असलेली ०१ हेक्टर अशी एकूण ०१ हे. २१ आर जमीन मी नाममात्र हस्तांतरण माझ्या मेहुण्याच्या नावे केले होते. हे म्हणणे खरे नाही की, ०१ हे. २१ आर वर माझ्या मेहुण्याचा कब्जा नाही व तो ती जमीन वहिवाटत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कौटुंबिक गरजेसाठी सुधीर पाटील यांना जमीन विकल्याचे मी खोटे सांगत आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील जिवंत असेपर्यंत ते व वडील मयत

झाल्यानंतर मी भारतबाई व चंद्रकला यांना जमीनीतील माल देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, वादींना दावा मिळकतीत हिस्सा मिळु नये म्हणून मी माझी पत्नी व मुलाच्या नावे खोटे हस्तांतरण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, बहिणींच्या लग्नात माझ्या वडीलांनी माण–पाण करुन सोने दिले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.९९ मधील जमीन महाराष्ट्र शासनाने संपादित केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बहिणींचे लग्न झाल्यामुळे व त्यांचे गोत्र बदलल्यामुळे त्यांना हिस्सा मिळत नाही, हे मी खोटे सांगत आहे. भारतबाई व चंद्रकला यांना वाटप दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, बहिणींना हिस्सा मिळु नये म्हणून मी खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ५ तर्फे विधिज्ञ श्री. जी. एच. कुसुमकर यांचेमार्फतः–**

२०. प्रतिवादी क्र.५ तर्फे विधीज्ञ यांचा वारंवार पुकार केला असता ते गैरहजर. करीता त्यांच्यातर्फे उलटतपास काही नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.08.21 16:59:25 +0530

**( श्रीमती. एस. डी. साबळे )**

दि. २१/०८/२०२५. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर.

औसा.